**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा उलटतपास.**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -मुनेश्वर हरिदास वंजारी.

**<u>वादी तर्फे वकील श्री बि.एस.मने यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

११. मी कुही येथे राहतो. मी सरकारी आय.टी.आय.कॉलेजला नोकरी करतो. माझे शिक्षण १० वी नापास असे आहे. पुराव्याचे शपथपत्र माझ्या सांगण्यावरून तयार केले होते, त्यातील मजकूर मी वाचून पाहिला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या आजोबाचे पुर्ण नाव गणेश पुरण वंजारी हे होते किंवा कसे हे मला माहित नाही. माझ्या आजोबाचे नाव गणेश असे होते. माझे आजोबा गणेश यांना तिन मुले होती. त्यांची नावे १)भगवानदास गणेश वंजारी, २)जिवनदास गणेश वंजारी व माझे वडील ३) हरिदास गणेश वंजारी असे होते. आजरोजी भगवान, जिवनदास व हरिदास हे मयत झालेले आहे. तसेच माझे आजोबा गणेश हे मयत झालेले आहे. हरिदास गणेश वंजारी यांना दोन मुली होत्या त्यांची नावे वादी प्रेमिला बबन कोलते व शोभा जिवन देवगडे (प्रतिवादी क्र.३) असे आहे व हरिदास गणेश वंजारी यांना मी एकुलता एक मुलगा आहे व मी सदर केसमध्ये प्रतिवादी क्र.१ म्हणून आहे. सदर केसमध्ये महेश मुनेश्वर वंजारी हा माझा मुलगा आहे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मौजा किनाळा, ता. उमरेड येथे जुना गट नंबर २४ मध्ये हरिदास गणेश वंजारी यांची जमिन होती. हे मला माहित नाही की, माझ्या आजोबांनी सदर जमिनीचे त्यांच्या तिन मुलांमध्ये पार्टीशन करून दिले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, माझ्या आजोबांनी केलेल्या पार्टीशनमध्ये भगवान गणेश वंजारी यांना गट न.२४ मधील २४/१ जमिनीचा हिस्सा मिळाला होता व त्यामध्ये एकूण क्षेत्रफळ ६.६८ हे. आर. जमिन त्यांना मिळाली होती किंवा कसे. जिवनदास गणेश वंजारी हे माझे काका होते. हे मला माहित नाही की, माझ्या आजोबांनी केलेल्या पार्टीशनमध्ये जिवनदास गणेश वंजारी यांना गट न.२४/२ मधील क्षेत्र ६.६६ हे. आर. मिळाले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, सदर पार्टीशनमध्ये माझ्या वडीलांच्या हिश्यावर गट क्र.२४/३ मधील क्षेत्र ६.६६

हे.आर. मिळाले होते किंवा कसे.

१३. आता मला नि.क्र.१७ वरिल अधिकारअभिलेख पंजी दाखविण्यात आली. त्यामध्ये भगवानदास गणेश वंजारी, जिवनदास गणेश वंजारी व माझे वडील हरिदास गणेश वंजारी यांची नावे वारस म्हणून लिहीलेली आहे. सदर नि.क्र.१७ प्रमाणे भगवानदास गणेश वंजारी यांच्या नावासमोर गट न.२४/१ व क्षेत्र ६६.६८ आ.रा.जी. असे दाखविलेले आहे. सदर दस्तऐवजाप्रमाणे माझे काका जिवनदास गणेश वंजारी यांच्या नावासमोर गट न.२४/२ व क्षेत्र ६.६६ आ.रा.जी. असे दाखविलेले आहे. सदर नि.क्र.१७ प्रमाणे माझे वडील हरिदास गणेश वंजारी यांच्या नावासमोर गट न.२४/३ व क्षेत्र ६.६६ आ.रा.जी. असे दाखविलेले आहे.

**मध्यान्हामुळे उलटतपास तहकूब.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि.२०.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड

**<u>मध्यान्हानंतर उर्वरित उलटतपास वादी तर्फे वकील श्री बि.एस.मने यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१४. हे मला माहित नाही की, गट न.२४/३ मधील आ.रा.जी. ६.६६ एकर शेतीपैकी ०.२० हे. आर. शेती ही लोअर वेना प्रकल्पामध्ये गेली किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेती ही प्रकल्पामध्ये गेल्यामुळे मला त्याआधारे नोकरी मिळाली. हे मला माहित नाही की, २४/३ या शेतीला नविन गट न.२२ पडला आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गट न.२२ च्या शेतीची आ.रा.जी.१.८६ हे. आर. अशी आहे. गट न.२२ ही शेती मौजा किनाळा येथे स्थित आहे व त्याचा पटवारी हलका नंबर २७ आहे व सदर शेती ही याच तालुक्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट न.२४/३ ही शेती वडिलोपार्जित आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर गट न.२४/३ मधील शेतीमध्ये वादीचा १/३ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गट न.२२ मधील शेतीची वादी ही माझ्यासोबत मालक आहे. वादी यांना लग्नामध्ये ३ तोळे सोने, तसेच वादी यांना लग्नानंतर रोख रक्कम दिली याबाबत मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१५. आता मला माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.३ मधील मजकूर 'वादी व प्रतिवादी यांना एकमुक्त रक्कम २,००,०००/– रूपये प्रत्येकी अंदाजे ३० वर्षापुर्वी दिले' हा मजकूर वाचुन दाखविण्यात आला, याबाबत मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. आता मला माझ्या शपथपत्रातील परिच्छेत क्र.३ मधील मजकूर 'सदर रकमेतुन प्रतिवादी क्र.३ ने तिच्या घराचे बांधकाम केले व वादीने तिच्या आवश्यक गरजेकरिता रकमेचा उपयोग केला' हा मजकूर वाचुन दाखविण्यात आला, याबाबत मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. आता मला माझ्या शपथपत्रातील परिच्छेत क्र.३ मधील मजकूर 'माझ्या वडीलांनी त्यांच्या जिवंतपणी वादीला व प्रतिवादी क्र.३ ला जे द्यायचे होते ते दिले त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.३ यांचा दावा शेतजमिनीमध्ये काहीही हिस्सा उरलेला नाही' हा मजकूर वाचुन दाखविण्यात आला तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर खोटा आहे.

१६. माझे वडील हरिदास गणेश वंजारी यांची भूमापन न.२२ आ.रा.जी.१.८६ हे.

आर. ही जमिन स्वकष्टाचीच होती हे दाखविण्यासाठी मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. ज्यावेळी माझ्या वडीलांनी गट न.२२ आ.रा.जी.१.८६ हे. आर. जमिनीचे बक्षीसपत्र करून दिले होते त्यावेळी माझ्या वडीलांचे वय ८० वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, बक्षीसपत्र करण्यासाठी मीच कागदपत्र आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या म्हातारपणाचा फायदा घेउन बेकायदेशीर व बोगस बक्षीसपत्र मी तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी बक्षसपत्र तयार केले त्यावेळी माझ्या वडीलांना चालता,फिरता व बोलता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी बक्षीसपत्र तयार केले त्यावेळी माझ्या वडीलांना काही समजत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, बक्षसपत्रावरील साक्षीदार हे माझे मित्र होते व माझ्या सांगण्यावरून त्यांनी त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर 'माझ्या वडीलांची माझ्या मुलाने सेवा केली' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेत क्र.५ मधील मजकूर खोटा लिहीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, बक्षीसपत्र करण्याच्या पुर्वीपासुन गट न.२२ मधील शेती माझ्या ताब्यात होती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, गट न.२२ मधील शेती ही माझ्या वडीलांच्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर बक्षीसपत्रान्वये मला वादमिळकतीचा ताबा मिळाला हे मी खोटे सांगत आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खोटा लिहीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर बक्षीसपत्र खोटे व बेकायदेशीर असल्यामुळे ते वादीवर बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने पाठविलेला दि.१८/०८/२०२१ रोजीचा नोटीस मला व माझ्या मुलाला मिळाला होता. हे मला माहित नाही की, सदर नोटीसमध्ये वादीचा १/३ हिस्सा वेगळा करून मागितला होता किंवा कसे. आता मला नि.क्र.२९ व ३० दाखविण्यात आला त्यावर माझ्या सह्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२९ व ३० वरिल नोटीस आम्हाला मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.१४ व १४अ वरिल बयान हे खोटे दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.२५ बक्षीसपत्र हे मी खोटे तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४४ मधील मजकूर मी खोटा लिहीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये वादीचा १/३ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा वारसा हक्काने वादमिळकत हिस्सा आहे. हे म्हणणे

खरे नाही की, मला वादीचा हिस्सा हडप करायचा आहे म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि.२०.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड